वन्यहत्तींपासून शेतपिकां व्यतिरिक्त अन्य मालमत्तेचे नुकसान झाल्यास संबंधितास नुकसान भरपाई देण्याबाबत .....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी- ०३.१८/प्र.क्र.८७(भाग-१)/फ-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २३ मार्च, २०१८

वाचा:

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक- डब्ल्यूएलपी- १०.०८/प्र.क्र.२७०/फ-१, दि. ०२.०७.२०१०.
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक- डब्ल्यूएलपी- २०१२/प्र.क्र.३२६/फ-१, दि. ०५.०९.२०१३.
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक- डब्ल्यूएलपी- ०४१३/प्र.क्र.१२३/फ-१, दि. २५.११.२०१३.
४. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक- डब्ल्यूएलपी- २०१२/प्र.क्र.३२६/फ-१, दि. ०९.०७.२०१५.
५. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक- डब्ल्यूएलपी- २०१२/प्र.क्र.३२६/फ-१, दि. २३.१२.२०१५.
६. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक- डब्ल्यूएलपी- २०१६/प्र.क्र.२९०/फ-१, दि. २८.११.२०१६.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्यात वन्यहत्तींचा नैसर्गिक अधिवास आढळून येत नाही, तथापि लगतच्या कर्नाटक राज्यातील वन्यहत्ती प्रथमत: सन २००२ मध्ये राज्यात आले असल्याचे निदर्शनास आले. सन २००४ नंतर यातील काही हत्तींनी कर्नाटक राज्यात परत न जाता महाराष्ट्रातच राहणे पसंत केले. सदर वन्यहत्ती हे कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यात शेतपिकांचे नुकसान करत असतात. राज्यातील रानडुक्कर, हरिण (सारंग व कुरंग), रानगवा, रोही (निलगाय), माकड, वानर तसेच वन्यहत्ती या वन्यप्राण्यांपासून शेतपिकाला किंवा फळबागांना नुकसान झाल्यास दि. ०२.०७.२०१०, दि. ०५.०९.२०१३, दि.२५.११.२०१३, दि. ०९.०७.२०१५ व दि. २३.१२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदींनुसार नुकसान भरपाईची रक्कम संबंधितांना अदा करण्यात येते. सदर शासन निर्णयांमध्ये नमूद वन्यप्राण्यांमधील वन्यहत्ती यांचेकडून शेतपिकाबरोबरच अन्य मालमत्तेचे नुकसान होत असते. सद्य:स्थितीत शेतपिक नुकसान भरपाई व्यतिरिक्त अन्य मालमत्तेच्या होणाऱ्या नुकसानीपोटी अर्थसहाय्याची तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे जनमानसांत निर्माण होणारे प्रतिकुल मत विचारात घेता, तसेच लोकप्रतिनीधी देखील विधानमंडळात याबाबत वारंवार विचारणा करून शासनाकडून सकारात्मक कार्यवाहीची अपेक्षा ठेवत असल्याने वन्यहत्तींकडून होणाऱ्या मालमत्तेच्या नुकसानीपोटी अर्थसहाय्य देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णयः-

राज्यातील वन्यहत्ती या वन्यप्राण्यापासून शेतपिकांव्यतिरिक्त अन्य मालमत्तेचे नुकसान झाल्यास खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येईल.

अन्य मालमत्तेच्या नुकसानीपोटी द्यावयाचे आर्थिक सहाय्य

अ. क्र.	तपशील	देय अर्थसहाय्याची रक्कम
१	शेती अवजारे व उपकरणे	बाजारभावाचे ५०% किंवा रू. ५,०००/- यापैकी कमी असणारी रक्कम
२	बैलगाडी	बाजारभावाचे ५०% किंवा रु. ५,०००/- यापैकी कमी असणारी रक्कम
३	संरक्षक भिंत, कुंपण	बाजारभावाचे ५०% किंवा रू १०,०००/- यापैकी कमी असणारी रक्कम

सदर अर्थसहाय्य खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून अनुज्ञेय असेल-

१) संबंधित शेतकरी नुकसानीची तक्रार आवश्यक त्या सर्व कागदपत्र व पुराव्यांसह अधिकारक्षेत्र असलेले नजीकचे वनरक्षक/ वनपाल/ वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेपैकी कोणाकडेही घटना घडलेपासून तीन दिवसांच्या आत करतील.

२) वन्यहत्तीकडून ज्या मालमत्तेचे नुकसान झाले असेल अशी मालमत्ता, साहित्य जागेवरील वस्तुस्थितीचा पंचनामा होईपर्यंत घटनास्थळावरुन हलविलेली नसावी.

३) प्रत्येक प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यानंतर घटना स्थळावर जाऊन संबंधीत (१) वनपरिक्षेत्र अधिकारी (२) कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, (३) तलाठी/ ग्रामसेवक या तीन सदस्यांच्या समितीमार्फत १४ दिवसांच्या आत पंचनामा करण्यात येईल व नुकसानीचे मुल्यमापन ठरवून अहवाल संबंधित सहाय्यक वनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी/ उपवनसंरक्षक यांना सादर करतील.

४) वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी समितीचा अहवाल सादर केल्यानंतर संबंधित सहाय्यक वनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी/ उपवनसंरक्षक प्रत्येक प्रकरणी आर्थिक सहाय्य देण्याचे आदेश चार कामाच्या दिवसांचे आत किंवा घटनेची तक्रार प्राप्त झाल्यापासून २३ दिवसांचे आत काढतील.

५) संबंधित सहाय्यक वनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी/ उपवनसंरक्षक यांनी आदेश काढल्यानंतर ०३ (तीन) कामाचे दिवसांचे आत किंवा घटनेची तक्रार प्राप्त झाल्यापासून २६ दिवसांचे आत आर्थिक सहाय्याची रक्कम बाधित व्यक्तीच्या खात्यात जमा करतील किंवा रेखांकित धनादेश हस्तांतरीत करतील.

६) वनजमिनीवर अतिक्रमणाव्दारे शेती करण्यात येत असेल तर संबंधितास अर्थसहाय्य अनुज्ञेय राहणार नाही.

७) भारतीय वन अधिनियम किंवा वन्यजीव (संरक्षण), अधिनियमांतर्गत ज्यांचे विरूद्ध गुन्हा नोंदविला गेला आहे, अशा व्यक्तिस सदरचा लाभ देता येणार नाही.

८) ज्या कुटुंबाची चार पेक्षा अधिक गुरे मुक्त चराईसाठी जंगलात जातात त्यांना अर्थसहाय्य अनुज्ञेय राहणार नाही.

९) सदर आर्थिक मदत ही या संदर्भात शासन निर्णय निर्गमित झाल्यापासूनच्या प्रकरणांमध्ये लागू करण्यात यावी.

१०) सदर शासन निर्णय, निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहे.

१२) हा शासन निर्णय वित्त विभागाचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२३१२४६५१७२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2018.03.23 12:48:57 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने),

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव (महसूल),महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव, (ग्राम विकास) ग्रामविकास व जलसंधारण विभाग , मंत्रालय, मुंबई.
११) सचिव (पशुसंवर्धन), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) सचिव (जलसंधारण), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) महासंचालक, माहिती व प्रसिध्दी, मंत्रालय, मुंबई.
१५) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ, नागपूर.
१८) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२०) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर/मुंबई (बोरीवली)
२१) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
२२) आयुक्त, कृषी आयुक्तालय, पुणे.

२३) विभागीय आयुक्त, (सर्व महसूल विभाग).
२४) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व.
२५) मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे
२६) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
२७) मुख्य वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली.
२८) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर.
२९) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.
३०) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर.
३१) वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, गोंदिया
३२) वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक
३३) सर्व जिल्हाधिकारी.
३४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
३५) सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी.
३६) उपसंचालक भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा.
३७) कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर).
३८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, पर्यटन विकास महामंडळ.
३९) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
४०) प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य, पर्यटन विकास महामंडळ.
४१) उपवनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व.
४२) उपवनसंरक्षक (वन्यजीव) सर्व.
४३) विभागीय वन अधिकारी सांगली/उस्मानाबाद/बीड / हिंगोली /चिपळूण.
४४) उप विभागीय वन अधिकारी संगमनेर/मालेगाव/ भोर.
४५) सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी.
४६) महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षण /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य , मुंबई / नागपूर.
४७) वित्त विभाग (व्यय-१० कार्यासन), मंत्रालय, मुंबई - ३२.
४८) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
४९) वन कक्षातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५०) फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).